## जोडपत्र - 5

***भांडवली बाजारासाठी आणि डेरिव्हेटिव्ज विभागांसाठी जोखीम प्रकटन दस्तऐवज***

या दस्तऐवजात स्टॉक एक्सचेंजेसच्या इक्विटीज/डेरिव्हेटिव्ज विभागांमध्ये व्यवहार करण्याविषयी महत्त्वाची माहिती समाविष्ट आहे. सर्व संभाव्य घटकांनी स्टॉक एक्सचेंजेसच्या इक्विटीज/डेरिव्हेटिव्ज विभागांमध्ये व्यवहार करण्यापूर्वी हा दस्तऐवज वाचावा.

स्टॉक एक्सचेंजेस/SEBI स्वतंत्रपणे किंवा संयुक्तपणे आणि अभिव्यक्तपणे किंवा गर्भितार्थाने या प्रकटन दस्तऐवजाच्या पूर्णत्वाची, पर्याप्ततेची किंवा अचूकतेची हमी देत नाहीत किंवा स्टॉक एक्सचेंजेस/SEBIने याचा पुरस्कार केलेला नाही किंवा विभागांमधील व्यवहारातील सहभागाच्या कोणतीही गुणवत्ता पारित केलेल्या नाही. हे संक्षिप्त विधान व्यवहारातील सर्व जोखमी आणि इतर महत्त्वाचे पैलू उघड करत नाही.

यातील जोखमी विचारात घेता तुम्ही ज्या प्रकारचे संबंध जोडत आहात आणि ज्या जोखमींना तुम्ही सामोरे जाणार आहात त्याचे स्वरुप तुम्हाला समजत असेल तरच तुम्ही व्यवहार करावेत.

तुम्हाला माहीत असले पाहिजे आणि तुम्ही मान्य केले पाहिजे कि स्टॉक एक्सचेंजेसवर व्यवहार केल्या जाणारे इक्विटी शेअर्स, डेरिव्हेटिव्ज करार किंवा इतर संलेख, ज्यात जोखमीचे विविध घटक असतात, ते सर्वसाधारणपणे अत्यंत मर्यादित स्रोत/मर्यादित गुंतवणूक आणि/किंवा व्यवहाराचा अनुभव आणि जोखीम सहन करण्याची मर्यादित क्षमता असलेल्या व्यक्तिंसाठी तरी उचित मार्ग नाही. त्यामुळे तुमच्या आर्थिक परिस्थितीचा विचार करता अशा प्रकारचे व्यवहार तुमच्यासाठी सोयीचे आहेत का याचा तुम्ही गंभीरपणे विचार करावा. जर तुम्ही स्टॉक एक्सचेंजेसवर व्यवहार केलात आणि काही विपरित परिणाम किंवा नुकसान झाले तर त्यासाठी फक्त तुम्हीच जबाबदार असाल आणि त्यासाठी स्टॉक एक्सचेंजेस/त्यांची क्लिअरिंग कॉर्पोरेशन्स आणि/किंवा SEBI कोणत्याही प्रकारे जबाबदार नसतील आणि तुम्ही असा युक्तीवाद करू शकणार नाही कि त्यातील जोखमींचे पुरेसे प्रकटन करण्यात आले नव्हते किंवा संबंधित स्टॉक ब्रोकरने त्यातील जोखमींची पूर्ण कल्पना तुम्हाला दिलेली नव्हती. परिणामांसाठी फक्त घटकच जबाबदार असतील आणि त्यापायी कोणताही करार विखंडित करता येणार नाही. तम्ही हे मानले आणि स्वीकारले पाहिजे कि स्टॉक एक्सचेंजेसवर डेरिव्हेटिव्ज करारांच्या खरेदी आणि/किंवा विक्रीचे आदेश निष्पादित करताना नफ्याची कोणतीही हमी नाही किंवा होणाऱ्या नुकसानासाठी कोणताही अपवाद केला जात नाही.

तुम्ही हे स्पष्टपणे समजून घेतले पाहिजे कि एखाद्या स्टॉक ब्रोकरमार्फत केलेले तुमचे व्यवहार तुमच्या स्टॉक ब्रोकरने निश्चीत केलेल्या काही औपचारिकतांची, ज्यात इतर विषयांबरोबरच तुमचा ग्राहक जाणून घ्या प्रपत्र, हक्क आणि कर्तव्यांचे वाचन, कराव्यात आणि करू नयेत अशा काही गोष्टी, वगैरेंचा समावेश असू शकेल, तुमच्याकडून पूर्तता केली जाण्याच्या अधीन असतील आणि ते संबंधित स्टॉक एक्सचेंज, त्याचे क्लिअरिंग कॉर्पोरेशन, SEBIने विहीत केलेली आणि वेळोवेळी अमलात असलेली मार्गदर्शक तत्त्वे आणि स्टॉक एक्सचेंजेसकडून किंवा त्याच्या क्लिअरिंग कॉर्पोरेशनकडून निर्गमित केली गेलेली आणि वेळोवेळी अंमलात असलेली परिपत्रके यांच्या अधीन असतील.

स्टॉक एक्सचेंजेस कोणताही सल्ला देत नाहीत किंवा तसा त्यांचा हेतूही नसतो आणि या दस्तऐवजातील कोणत्याही माहीतीच्या आधारे कोणत्याही व्यक्तीने कोणत्याही स्टॉक ब्रोकरबरोबर आणि/किंवा तृतीय पक्षाबरोबर स्थापित केलेल्या व्यावसायिक संबंधांसाठी ते जबाबदार नसतील. या दस्तऐवजात असलेली कोणतीही माहिती व्यावसायिक सल्ला मानू नये. कोणत्याही व्यवहाराचा विचार अशा व्यवहारात असलेल्या जोखमी पूर्णपणे समजून घेतल्याशिवाय किंवा त्यांचा आढावा घेतल्याशिवाय करू नये. तुम्हाला खात्री नसेल तर, तुम्ही त्याबाबतीत व्यावसायिक सल्ला घेतला पाहिजे.

व्यवहार करण्याचा किंवा तुमच्यासाठी व्यवहार करण्यासाठी कोणाला तरी अधिकार देण्याचा विचार करताना, तुम्हाला खालील गोष्टींची माहिती असावी किंवा त्या तुम्ही नीटपणे समजून घ्याव्यातः-

### 1. पायाभूत जोखमीः

#### 1.1 अधिक उच्च चंचलतेच्या जोखमीः

चंचलता म्हणजे जेव्हा स्टॉक एक्सचेंजेसवर व्यवहार चालू असतात तेव्हा एखाद्या सिक्युरिटीच्या/डेरिव्हेटिव्ज कराराच्या किंमतीत होणारे गतिशील बदल. सर्वसाधारणपणे, एखाद्या सिक्युरिटीतील/डेरिव्हेटिव्ज करारातील चंचलता जेवढी मोठी, तेवढेच त्यांच्या किंमतीतील चढ-उतार मोठे असतात. सामान्यपणे, कमी व्यवहार होणाऱ्या सिक्युरिटीज/डेरिव्हेटिव्ज करारांतील चंचलता सक्रिय सिक्युरिटीज/डेरिव्हेटिव्ज करारांपेक्षा मोठी असते. चंचलतेच्या परिणामी, तुमच्या आदेशाची अंशतः कार्यवाही केली जाऊ शकेल किंवा अजिबात केली जाऊ शकणार नाही, किंवा तुमच्या आदेशाची कार्यवाही ज्या किंमतीला केली गेली असेल ती शेवटच्या व्यवहारातील किंमतीपेक्षा खूप वेगळी असू शकेल किंवा नंतर खूप बदलू शकेल, परिणामी संभाव्य किंवा खरोखरीचे नुकसान होऊ शकेल.

#### 1.2 कमी रोकडसुलभतेची जोखीम:

रोकडसुलभतेचा अर्थ बाजारातील सहभागींच्या सिक्युरिटीज/डेरिव्हेटीव्ज करार एका स्पर्धात्मक किंमतीला आणि किंमतीतील किमान फरकाने तातडीने खरेदी करण्याची/विकण्याची क्षमता. सर्वसाधारणपणे, असे गृहित धरले जाते कि बाजारात उपलब्ध असलेल्या आदेशांची संख्या

जेवढी जास्त तेवढी रोकडसुलभता मोठी. रोकडसुलभता महत्त्वाची आहे कारण मोठ्या रोकडसुलभतेमुळे गुंतवणूकदाराला सिक्युरिटीज/डेरिव्हेटिव्ज करार जलद आणि किंमतीतील कमीत कमी फरकाने खरेदी करणे आणि/किंवा विकणे सोपे जाते, आणि परिणामी, खरेदी केलेल्या किंवा विकलेल्या सिक्युरिटीज/डेरिव्हेटिव्ज करारांसाठी गुंतवणूकदार स्पर्धात्मक किंमत देण्याची किंवा त्याला ती मिळण्याची शक्यता जास्त असते. काही सिक्युरिटीज/डेरिव्हेटिव्ज करारांमध्ये सक्रिय सिक्युरिटीज/डेरिव्हेटिव्ज करारांच्या तुलनेत कमी रोकडसुलभतेची जोखीम असू शकेल. परिणामी, तुमच्या आदेशाची केवळ अंशतः कार्यवाही केली जाऊ शकेल किंवा तुलनेने अधिक किंमतीला कार्यवाही केली जाऊ शकेल किंवा अजिबात केली जाऊ शकणार नाही.

**1.2.1** रोजच्या व्यवहाराच्या धोरणाचा एक भाग म्हणून सिक्युरिटीज/डेरिव्हेटिव्जची खरेदी करणे किंवा विक्री करणे याच्या परिणामी सुद्धा नुकसान होऊ शकते, कारण अशा परिस्थितीत सिक्युरिटीज/डेरिव्हेटिव्जच्या करारांची विक्री/खरेदी अपेक्षित किंमतीच्या पातळीच्या तुलनेत कमी किंमतीला करणे भाग पडते, जेणेकरून सिक्युरिटी/डेरिव्हेटिव्ज करार डिलीव्हर करण्यासाठी किंवा मिळवण्यासाठी कोणतीही खुली परिस्थिती किंवा कर्तव्य राहू नये.

**1.3 विस्ताराची जोखीम:**
विस्ताराचा संदर्भ खरेदीच्या आणि विक्रीच्या उत्तम किंमतीतील फरकाशी आहे. एखादी सिक्युरिटी/डेरिव्हेटिव करार खरेदी/विक्री करण्याची किंमत आणि ताबडतोब ती विक्री/खरेदी करण्याची किंमत, यातील फरकाचे ते निदर्शक आहे. कमी रोकडसुलभता आणि उच्च चंचलता याचा परिणाम कमी रोकडसुलभ किंवा अरोकडसुलभ सिक्युरिटीज/डेरिव्हेटिव्ज करारांसाठी सामान्यापेक्षा विशाल फरकात होऊ शकतो. त्यामुळे अधिक चांगली किंमत मिळण्यात अडथळा होण्यात होऊ शकतो.

**1.4 जोखीम कमी करणारे आदेशः**
काही ठराविक रकमेपर्यंत नुकसान सीमित ठेवणारे आदेश (उदा.: "स्टॉप लॉस" ऑर्डर्स, किंवा "लिमीट" ऑर्डर्स) देणे अनेक वेळा प्रभावी ठरत नाही कारण बाजारातील गतिमान परिस्थितीमुळे अशा आदेशांची कार्यवाही करणे अशक्य होऊ शकते.

**1.4.1** जर विरुद्ध बाजूकडून आदेश उपलब्ध असतील, तर किंमतीचा विचार न करता एखाद्या "मार्केट" आदेशाची कार्यवाही झटपट केली जाईल, आणि जरी ग्राहकाच्या "मार्केट" आदेशावर कार्यवाही झटपट केली जाऊ शकेल, तरीही ही कार्यवाही थकित आदेशांसाठी आणि उपलब्ध किंमतीवर असेल, ज्याने आदेशित संख्या किंमत-वेळ प्राधान्यावर पूर्ण होईल. पण हे समजून घेतले जावे कि या किंमती सिक्युरिटी/डेरिव्हेटिव्ज कराराच्या शेवटच्या व्यवहारातील किंमतीपेक्षा किंवा त्यांच्या सर्वोत्तम किंमतीपेक्षा खूप वेगळया असू शकतील.

**1.4.2** एखाद्या "लिमीट" आदेशाची कार्यवाही केवळ आदेशासाठी निश्चित केलेल्या "लिमीट" किंमतीला किंवा अधिक चांगल्या किंमतीला केली जाईल. तथापि, ग्राहकाला किंमतीविषयी संरक्षण मिळते पण त्याच वेळी अशीही शक्यता आहे कि आदेशाची अजिबात कार्यवाही केली जाऊ शकणार नाही.

**1.4.3** स्टॉप लॉस आदेश साधारणपणे एखाद्या स्टॉक/डेरिव्हेटिव्ज कराराच्या चालू किंमतीपासून "दूर" जातो, आणि सिक्युरिटी/डेरिव्हेटिव करार स्टॉप किंमतीपर्यंत पोचला किंवा त्या किंमतींवर व्यवहार झाला तर असा आदेश सक्रिय केला जातो. विक्रीचे स्टॉप आदेश सामान्यपणे चालू किंमतीच्या खाली नोंदविले जातात, आणि खरेदीचे स्टॉप आदेश सामान्यपणे चालू किंमतीच्या वर नोंदविले जातात. जेव्हा सिक्युरिटी /डेरिव्हेटिव्ज करार पूर्व-निश्चीत किंमतीपर्यंत पोचतात, किंवा अशा किंमतींवर व्यवहार केला जातो, स्टॉप लॉस आदेशाचे रुपांतर मार्केट/लिमीट आदेशात होते आणि आणि मर्यादेवर किंवा अधिक चांगल्या किंमतीवर कार्यवाही होते. त्यामुळे लिमीट आदेशाची कार्यवाही करता येईल याची कोणतीही हमी नाही कारण एखादी सिक्युरिटी/डेरिव्हेटिव्ज करार पूर्व-निश्चीत किंमत भेदू शकेल, आणि असे झाल्यास अशा आदेशावर कार्यवाही न होण्याची जोखीम उद्भवू शकेल, अगदी तसेच जसे एखाद्या नियमित लिमीट आदेशाच्या बाबतीत होते.

**1.5 बातम्यांच्या घोषणांची जोखीमः**
स्टॉक/डेरिव्हेटिव्ज कराराच्या किंमतींना प्रभावीत करू शकतील अशा बातम्यांची घोषणा व्यवहारादरम्यान होऊ शकेल, आणि त्याच्या जोडीला कमी रोकडसुलभता आणि उच्च चंचलता असेल, तर त्यामुळे सिक्युरिटी/कराराच्या किंमतीत अचानक अनपेक्षित सकारात्मक किंवा नकारात्मक चढउतार होऊ शकतील.

**1.6 अफवांची जोखीमः**
अनेक वेळा कंपन्या /चलने यांच्याविषयी तोंडोतोंडी, वर्तमानपत्रातून, वेबसाइटस्वरून किंवा न्यूज एजन्सीज इत्यादिंद्वारे अफवा पसरविल्या जातात. गुंतवणूकदारांनी याबाबत सावध रहावे आणि अफवांच्या आधारे कृती करण्यापासून परावृत्त व्हावे.

**1.7 प्रणाली जोखीम:**
बाजार उघडण्यापूर्वी आणि बंद होण्यापूर्वी उच्च राशी व्यवहार वारंवार होतील. असे उच्च राशी व्यहार दिवसातील इतर वेळा देखील होऊ शकतील. त्यामुळे आदेशांच्या कार्यवाहीत किंवा पुष्टीकरणात दिरंगाई होऊ शकेल.

**1.7.1** चंचलतेच्या कालावधींमध्ये, बाजारातील सहभागींद्वारा त्यांच्या आदेशात किंवा किंमतीत सातत्याने बदल केल्याने किंवा नवीन आदेश दिल्याने, आदेशाच्या कार्यवाहीत किंवा पुष्टीकरणात दिरंगाई होऊ शकेल.

**1.7.2** बाजारातील काही विशिष्ट परिस्थितीत, बाजारातील एखाद्या स्थितीचे परिसमापन वास्तव किंमतीला करणे कठिण होऊ शकेल किंवा अजिबात करता येऊ शकणार नाही, जेव्हा विक्रीच्या बाजूने किंवा खरेदीच्या बाजूने कोणतेही शिल्लक आदेश नसतील किंवा व्यवहारातील कोणत्याही असामान्य कृतीमुळे किंवा सिक्युरिटी/डेरिव्हेटिव्ज करार सर्किट फिल्टर्सपर्यंत पोचल्यामुळे किंवा इतर कोणत्याही कारणासाठी एखाद्या सिक्युरिटी/डेरिव्हेटिव्ज करारातील व्यवहार थांबविले जातील.

**1.8 प्रणाली/नेटवर्कवरील गर्दीः**

एक्सचेंजेसमधील व्यवहार, आदेश घेणे व मार्गस्थ करणे, हे उपग्रह/लीज्ड लाइन आधारित कम्युनिकेशन, तंत्रज्ञाने आणि संगणक प्रणालींचा संयोग यांच्या आधारे इलेक्ट्रॉनिक पद्धतीने चालते. अशा प्रकारे, तिथे कम्युनिकेशन बंद पडणे किंवा प्रणालीतील समस्या किंवा प्रणालीकडून मंद किंवा उशीराने प्रतिसाद मिळणे किंवा व्यवहार बंद होणे, किंवा अशा इतर कोणत्याही समस्या-अडचणी येण्याची शक्यता असते, ज्यामुळे व्यवहाराच्या प्रणाली/नेटवर्कपर्यंत पोचणे शक्य होत नाही, जे नियंत्रणाबाहेर असू शकेल आणि त्याचा परिणाम खरेदी किंवा विक्रीच्या आदेशांवर प्रक्रिया करण्यात अंशतः किंवा पूर्णपणे दिरंगाई होणे किंवा प्रक्रिया न होण्यात होऊ शकेल. तुम्हाला नोंद घेण्याचा इशारा देण्यात येतो कि जरी या समस्या तात्पुरत्या स्वरुपाच्या असतात, तरी जेव्हा तुमच्यापाशी थकित खुली स्थिती किंवा कार्यवाही न झालेले आदेश असतात तेव्हा सर्व कार्यवाही झालेले व्यवहार पूर्ण करण्याच्या तुमच्या कर्तव्याला ही जोखीम आडवी येऊ शकते.

**2. जेथपर्यंत डेरिव्हेटिव्ज विभागांचा संबंध आहे, कृपया नोंद घ्या आणि खालील अतिरिक्त वैशिष्ट्यांशी स्वतःला चांगले परिचित करून घ्याः-**

**2.1 'लीव्हरेज" किंवा 'गिअरिंग" चा परिणाम:**

डेरिव्हेटिव्ज बाजारात, डेरिव्हेटिव्ज कराराच्या मूल्याच्या मानाने मार्जीनची रक्कम छोटी असते, त्यामुळे व्यवहार "लीव्हरेज" किंवा 'गिअर्ड" केले जातात. डेरिव्हेटिव्ज व्यवहार तसे छोट्या मार्जीनच्या रकमेने केले जातात, पण ते मार्जीनच्या तुलनेत मोठा नफा किंवा नुकसान होण्याची शक्यता देतात. पण डेरिव्हेटिव्जमधील व्यवहारात मोठी जोखीम असते.

म्हणून प्रत्यक्षात डेरिव्हेटिव्जमध्ये व्यवहार करण्यापूर्वी तुम्ही पुढील विधाने पूर्णपणे समजून घ्यावीत आणि आपली परिस्थिती, आर्थिक स्रोत वगैरे सुद्धा विचारात घेऊन व्यवहार करावा. जर किंमती तुमच्या विरोधात गेल्या, तर अपेक्षाकृत अल्प कालावधीत तुम्ही मार्जीन रक्कम अंशतः किंवा पूर्णपणे गमावू शकाल. ह्याशिवाय, तुमचे नुकसान मूळ मार्जीन रकमेपेक्षा जास्तही असू शकेल.

ए. हवाला व्यवहारात सर्व स्थितींची रोज व्यवहारपूर्ति समाविष्ट आहे. रोज खुल्या स्थिती निर्देशांकाच्या/डेरिव्हेटिव्ज करारांच्या बंद पातळीच्या आधारे बाजारात चिन्हांकित केल्या जातात. करार तुमच्या विरोधात पुढे सरकला असेल, तर तुम्हाला अशा हालचालीतून होणाऱ्या नुकसानाची (अनुमानित) रक्कम जमा करावी लागेल. रक्कम एका विशिष्ट ठरवून दिलेल्या कालावधीच्या आत, साधारणपणे पुढच्या दिवसाचे व्यवहार सुरू होण्यापूर्वी, प्रदान करावी लागते.

बी. तुम्ही ठरवून दिलेल्या वेळेपूर्वी रक्कम जमा करू शकला नाहीत किंवा तुमच्या खात्यात थकबाकी असेल तर, स्टॉक ब्रोकर स्थितींचे संपूर्णपणे किंवा अंशतः परिसमापन करू शकेल किंवा बदल्यात सिक्यूरिटीज देऊ शकेल. या बाबतीत, अशा क्लोज-आउट्समुळे होणाऱ्या कोणत्याही नुकसानासाठी तुम्हीच जबाबदार असाल.

सी. बाजारातील काही विशिष्ट परिस्थितींत, एखाद्या गुंतवणूकदाराला व्यवहारांची कार्यवाही करणे कठिण किंवा अशक्य ठरू शकते. उदाहरणार्थ, ही परिस्थिती अरोकडसुलभता, म्हणजे जेव्हा बिड्स किंवा ऑफर्स पुरेशा नसतात, किंवा किंमतीवरील बंधनांमुळे किंवा सर्किट ब्रेकर्समुळे वगैरे व्यवहार निलंबित असतात, अशामुळे येऊ शकते.

डी. बाजारात स्थैर्य राखण्याच्या दृष्टीने, खालील पावले उचलली जाऊ शकतीलः मार्जीनच्या दरातील बदल, कॅश मार्जीन किंवा इतर दरात वाढ. या नवीन उपाययोजना विद्यमान खुल्या हितसंबंधाना सुद्धा लागू केल्या जाऊ शकतात. अशा परिस्थितीत, तुम्हाला अतिरिक्त मार्जीन ठेवावे लागेल किंवा तुमची स्थिती कमी करावी लागेल.

इ. तुम्ही तुमच्या ब्रोकरला तुम्ही व्यवहार करण्याचे योजत असलेल्या डेरिव्हेटिव्ज करारांचा संपूर्ण तपशील विचारला पाहिजे, अर्थात, कराराची विनिर्दिष्टे आणि संलग्न कर्तव्ये.

**2.2 चलनविषयक जोखमीः**

1. विदेशी चलनाचे प्राबल्य असलेल्या करारातील, मग ते तुमच्या स्वतःच्या किंवा दुसऱ्याच्या अधिकारितेतील असोत, व्यवहारातील नफा किंवा नुकसान यावर चलनाच्या दरातील चढउतारांचा परिणाम होईल जेव्हा कराराच्या चलनाचे दुसऱ्या चलनात रुपांतरण करणे आवश्यक असेल.

2. बाजारातील काही विशिष्ट परिस्थितीत, तुम्हाला एखादी स्थिती परिसमाप्त करणे कठिण किंवा अशक्य ठरू शकेल. हे घडू शकेल, उदाहरणार्थ, जेव्हा चलन अनियंत्रित केले जाईल किंवा फिक्स्ड ट्रेडिंग बँडस् विस्तृत केले जातील.

3. चलनाच्या किंमती प्रचंड चंचल असतात. चलनाच्या किंमतीतील चढउतार, इतर बाबींबरोबरच, मागणी-पुरवठा संबंधातील बदल; व्यापार, आर्थिक, पैसाविषयक, विनिमय नियंत्रण कार्यक्रम आणि सरकारी धोरणे; विदेशातील राजकीय आणि आर्थिक घटना आणि धोरणे; राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय व्याज दरांतील बदल आणि चलनफुगवटा; चलनाचे अवमूल्यन; आणि बाजाराच्या ठिकाणच्या सेंटीमेंटस् यामुळे प्रभावीत होऊ शकतात. यापैकी कोणत्याही घटकाचे नियंत्रण व्यक्तीगत सल्लागार करू शकत नाही आणि सल्लागाराच्या सल्ल्याची परिणती एखाद्या सहभागी ग्राहकासाठी नफादायक व्यवहारात होऊ शकेल किंवा एखाद्या ग्राहकाचे अशा घटनांमुळे नुकसान होणार नाही अशी कोणतीही हमी देता येत नाही.

**2.3 ऑप्शन धारकांची जोखीमः**

1. एखाद्या ऑप्शन धारकाला अपेक्षाकृत अल्प वेळेत ऑप्शनसाठी प्रदान केलेली संपूर्ण रक्कम गमावण्याची जोखीम असते. ही जोखीम ऑप्शनची प्रकृति दर्शवते, जी म्हणजे ऑप्शनची अवधि संपल्यावर संपत्ति वाया जाणे. एखादा ऑप्शन धारक, जो त्याचा ऑप्शन त्याच्या समाप्तीपूर्वी दुय्यम बाजारात विकत नाही किंवा समाप्तिपूर्वी त्याचा वापर करत नाही, त्याची ऑप्शनमधील संपूर्ण गुंतवणूक निश्चितच गमावेल. ऑप्शन समाप्त होण्यापूर्वी त्याची अंतर्निहित किंमत, ऑप्शनचा खर्च भरून निघण्यासाठी पुरेशा मर्यादेपर्यंत, अपेक्षित दिशेने बदलली नाही, तर गुंतवणूकदार त्याची ऑप्शनमधील गुंतवणूक मोठ्या प्रमाणावर किंवा संपूर्णपणे गमावेल.

2. एक्सचेंज कार्यवाहीवर बंधने घालू शकेल आणि त्याला काही विशिष्ट परिस्थितीत काही वेळा ऑप्शन्सच्या कार्यवाहीवर बंधने घालण्याचा निखालस हक्क आहे.

**2.4 ऑप्शन राइटर्सच्या जोखमी:**

1. त्याच्या अंतर्निहित किंमतीतील चढउतार अपेक्षित दिशेने नसतील तर, ऑप्शन राइटर मोठी रक्कम गमावण्याची जोखीम पत्करत असतो.
2. ऑप्शन राइटर होण्याची जोखीम तशाच अंतर्निहित हितसंबंधांच्या इतर ऑप्शन्सची खरेदी करून आणि त्यायोगे विस्तारलेली स्थिती पत्करून किंवा ऑप्शन्स बाजारातून किंवा अन्य बाजारांतून इतर प्रकारच्या हेजिंग स्थिती संपादित करून कमी केली जाऊ शकेल. तथापि, जिथे राइटरने विस्तार किंवा इतर हेजिंग स्थिती पत्करल्या आहेत तिथे सुद्धा जोखीम मोठीच असेल. विस्तार स्थिती ही साध्या 'लाँग' किंवा 'शॉर्ट' स्थितीपेक्षा कमी जोखमीची असते असे नाही.
3. अनेक ऑप्शन्स एकत्रितपणे खरेदी करणे किंवा लिहीणे, किंवा अंतर्निहित हितसंबंधांच्या शॉर्ट विक्री किंवा खरेदीबरोबर ऑप्शन्स खरेदी करणे किंवा लिहीणे, ह्याचा समावेश असलेले व्यवहार गुंतवणूकदारासाठी अतिरिक्त जोखीम प्रस्तुत करतात. ऑप्शन विस्तारसारखे संयुक्त व्यवहार हे एकमेव विकल्प खरेदी करणे किंवा लिहीणे यापेक्षा अधिक गुंतागुंतीचे असतात. आणि त्याच्याही पुढे नोंद घेण्यात यावी कि, गुंतवणूकीच्या कोणत्याही क्षेत्रा प्रमाणेच, चांगली समजून न घेतलेली गुंतागुंत ही स्वतःच एक जोखमीचा घटक आहे. इथे असे सुचवायचे नाही की संयुक्त धोरणांचा विचार करून नये, परंतु सर्व ऑप्शन गुंतवणूकींच्या बाबतीत अशा एखाद्या व्यक्तिचा सल्ला घेणे योग्य ठरेल, ज्याला बाजारातील विविध प्रकारच्या परिस्थितीत संयुक्त व्यवहारातील जोखमी आणि संभाव्य लाभ यांच्या संबंधात अनुभव आणि ज्ञान असेल.

**3. वायरलेस तंत्रज्ञान/स्मार्ट ऑर्डर रुटिंग किंवा इतर कोणत्याही तंत्रज्ञानामार्फत व्यवहार करणे:**

वायरलेस तंत्रज्ञान/स्मार्ट ऑर्डर रुटिंग किंवा इतर कोणत्याही तंत्रज्ञानामार्फत सिक्युरिटीज व्यवहार करण्याशी संबंधित वैशिष्ट्ये, जोखमी, जबाबदाऱ्या, कर्तव्ये आणि दायित्वे यांची व्याख्या करणाऱ्या कोणत्याही तरतूदी स्टॉक ब्रोकरने ग्राहकाच्या नजरेला आणाव्यात.

**4. सर्वसाधारण:**

**4.1** 'घटक' शब्दाचा अर्थ असेल आणि त्यात समाविष्ट असतील एखादे अशील, एखादा ग्राहक, किंवा एखादा गुंतवणूकदार, जो एक्सचेंजेसद्वारे पुरविण्यात आलेल्या यंत्रणेमार्फत सिक्युरिटीज/डेरिव्हेटिव्ज करारांच्या संपादनाच्या आणि/किंवा विक्रीच्या हेतूने स्टॉक ब्रोकरमार्फत व्यवहार करतो.

**4.2** 'स्टॉक ब्रोकर' शब्दाचा अर्थ असेल आणि त्यात समाविष्ट असतील एखादा स्टॉक ब्रोकर, ब्रोकर किंवा स्टॉक ब्रोकर, ज्याला एक्सचेंजेसनी तसे दाखल करून घेतले आहे आणि जो SEBIकडील नोंदणी प्रमाणपत्र धारण करतो.

# परिशिष्ट - 4

## स्टॉक ब्रोकर्स, सब-ब्रोकर्स आणि अशीलाचे हक्क आणि कर्तव्ये

***SEBI आणि स्टॉक एक्सचेंजेसनी विहीत केल्याप्रमाणे***

1. अशील त्याच सिक्युरिटीज/करारात/इतर सलेखांमध्ये गुंतवणूक करतील ज्यांना एक्सचेंजेस/भारतीय प्रतीभूती आणि विनिमय मंडळा (SEBI)च्या नियम, उपकलमे आणि नियमनांमध्ये केलेल्या व्याख्येप्रमाणे आणि त्याखाली वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या परिपत्रकांनुसार/नोटीसांनुसार व्यवहारांसाठी मान्यता दिली गेली आहे.

2. स्टॉक ब्रोकर, सब-ब्रोकर आणि अशील एक्सचेंजेसचे नियम, उपकलमे आणि नियमने आणि त्याखाली निर्गमित केलेल्या परिपत्रकांशी/नोटीसेसशी आणि SEBIच्या नियम आणि नियमनांशी आणि वेळोवेळी अंमलात असू शकतील अशा सरकारी प्राधीकरणांच्या अधिसूचनांशी बांधील असतील.

3. अशील स्टॉक ब्रोकरच्या सिक्युरिटीज आणि/किंवा डेरिव्हेटिव्ज करारांमध्ये व्यवहार करण्याच्या क्षमतेबाबत आणि स्टॉक ब्रोकरमार्फत आदेशांची कार्यवाही करण्याची इच्छा आहे, याबाबत स्वतःचे समाधान करून घ्यावे आणि अशीलाने स्टॉक ब्रोकरच्यामार्फत आदेशांची कार्यवाही करण्यापूर्वी अशा क्षमतेबाबत स्वतःचे समाधान करून घेणे वेळोवेळी चालूच ठेवावे.

4. स्टॉक ब्रोकरने अशीलाचा अस्सलपणा आणि आर्थिक भक्कमपणाबाबत आणि पुरविण्यात येणाऱ्या सेवांशी संबंधित गुंतवणूकींच्या उद्दिष्टांबाबत सातत्याने समाधान करून घ्यावे.

5. स्टॉक ब्रोकरने अशीलाला कोणत्याही मर्यादा, दायित्वे आणि स्टॉक ब्रोकर ज्या क्षमतेत काम करतो त्यासह करावयाच्या व्यवसायासाठी स्टॉक ब्रोकरच्या दायित्वाच्या नेमक्या स्वरुपाबाबत जागरुक करावे.

6. सब-ब्रोकर आवश्यक ते सहाय्य करेल आणि स्टॉक ब्रोकरला त्याच्या अशीला(लां) शी करण्यात येणाऱ्या सर्व व्यवहारांत सहकार्य करेल.

**अशीलाची माहिती**

7. अशीलाने "खाते उघडण्याच्या प्रपत्रात" स्टॉक ब्रोकरला आवश्यक असलेले सर्व तपशील स्टॉक एक्सचेंजेसने/SEBIने वेळोवेळी बंधनकारक केलेल्या समर्थनार्थ कागदपत्रांसह पुरवावा.

8. अशीलाने खाते उघडण्याच्या कागदपत्रांतील सर्व बंधनकारक तरतूदींशी स्वतःला चांगले परिचित करून घ्यावे. अशीलाने स्वीकारलेल्या अटी आणि शर्तींनुसार, स्टॉक ब्रोकरने विनिर्दिष्टीत केलेली कोणतीही अतिरिक्त कलमे किंवा कागदपत्रे बंधनकारक नसतील.

9. अशीलाने खाते उघडताना आणि त्यानंतर 'खाते उघडण्याच्या प्रपत्रात' पुरविलेल्या माहितीत, परिसमापन विनंती अर्ज/नादारी विनंती अर्ज किंवा त्याच्या क्षमतेवर परिणाम करणाऱ्या कोणत्याही न्यायालयीन वादासह कोणत्याही बदलांबद्दल स्टॉक ब्रोकरला ताबडतोब लेखी अधिसूचित करावे. अशीलाने नियतकालीन तत्त्वावर स्टॉक ब्रोकरला आर्थिक माहिती पुरवावी/अद्यतन करावी.

10. स्टॉक ब्रोकरने आणि सब-ब्रोकरने खाते उघडण्याच्या प्रपत्रात नमूद केलेल्याप्रमाणे अशीलाचा सर्व तपशील किंवा अशीलाच्या संबंधातील सर्व माहिती गोपनीय पद्धतीने राखावी आणि असे कि कोणत्याही कायदेशीर/नियामक आवश्यकतांखाली गरज असल्याशिवाय ती कोणत्याही व्यक्तीला/अधिकाऱ्याला उघड करू नये. तथापि, स्टॉक ब्रोकर त्याच्या अशीलाविषयीची माहिती कोणत्याही व्यक्तीला किंवा अधिकाऱ्याला अशीलाच्या अभिव्यक्त परवानगीने उघड करू शकेल.

**मार्जीन्स**

11. ज्या विभागांमध्ये अशील व्यवहार करतो त्यांना वेळोवेळी लागू असल्याप्रमाणे, स्टॉक ब्रोकरला किंवा एक्सचेंजला आवश्यक वाटतात अशा किंवा SEBIने निर्देश दिलेला असू शकेल अशा प्रारंभिक मार्जीन्स, विथहोल्डिंग मार्जीन्स, स्पेशल मार्जीन्स किंवा अशाच इतर मार्जीन्सचे अशील प्रदान करेल. स्टॉक ब्रोकरला संपूर्णपणे एकट्याच्या आणि निखालस स्वेच्छानिर्णयाने अतिरिक्त मार्जीन्स (जरी ती एक्सचेंजेस,

क्लिअरिंग हाउस/क्लिअरिंग कॉर्पोरेशन किंवा SEBIद्वारा आवश्यक नसतील) वसूल करण्याची परवानगी आहे आणि ठरवून दिलेल्या वेळेच्या आत अशा मार्जीन्सचे प्रदान करण्यास अशील कर्तव्यप्राप्त आहे.

12. अशीलाला हे समजते कि अशीलाद्वारे मार्जीन्सचे प्रदान म्हणजे सर्व देयांचे संपूर्ण समाधान असे गृहित असणे आवश्यक नाही. सातत्याने मार्जीन्स प्रदान केलेली असली तरीही, त्याच्या व्यवहाराच्या व्यवहारपूर्ततेसाठी, करार आदेश देईल/गरज असेल त्याप्रमाणे अशा आणखी रकमांचे प्रदान करण्यास अशील कर्तव्यप्राप्त (किंवा प्राप्त करण्यास अधिकारी) असू शकेल.

**व्यवहार आणि व्यवहारपूर्ति**

13. अशील सिक्युरिटी/डेरिव्हेटिव्ज करारांच्या खरेदीसाठी किंवा विक्रीसाठी, अशील आणि स्टॉक ब्रोकर यांनी परस्परात मान्य केल्याप्रमाणे लेखी किंवा प्रपत्रातून किंवा पद्धतीने आदेश देईल. स्टॉक ब्रोकर अशीलाच्या व्यवहाराचे आदेश देण्याची आणि त्यांवर कार्यवाही केवळ त्या अशीलाला नेमून दिलेल्या युनिक क्लाएंट कोडमध्ये करण्याची, खात्री करेल.

14. स्टॉक ब्रोकर अशीलाला व्यवहार/व्यवहारपूर्ति चक्र, डिलीव्हरी/प्रदानाचे नियोजन, त्यातील कोणत्याही बदलांची वेळोवेळी माहिती देत राहील, आणि जिथे व्यवहाराची कार्यवाही झाली आहे त्या संबंधित स्टॉक एक्सचेंजच्या अशा नियोजनांचे/कार्यपद्धतींचे अनुपालन करणे ही पर्यायाने अशीलाची जबाबदारी असेल.

15. स्टॉक ब्रोकर खात्री करेल कि अशीलाने जमा केलेले पैसे/सिक्युरिटीज तो त्याच्या स्वतःच्या किंवा इतर कोणत्याही अशीलाच्या खात्यापेक्षा वेगळया स्वतंत्र खात्यात जमा करेल आणि SEBIचे नियम, नियमने, परिपत्रके, नोटीसेस, मार्गदर्शक तत्त्वे आणि/किंवा एक्सचेंजचे नियम, नियमने, उपकलमे, परिपत्रके आणि नोटीसेस यात नमूद केलेल्या हेतूव्यतिरिक्त त्याच्या स्वतःसाठी किंवा इतर कोणत्याही अशीलासाठी वापरणार नाही.

16. जिथे एक्सचेंज स्वाधिकारात व्यवहार रद्द करते तेव्हा अशीलाच्या वतीने केलेले सर्व व्यवहार वस्तुतः रद्द सिद्ध होतात. अशा वेळी स्टॉक ब्रोकर अशीलाबरोबरचा संबंधित करार रद्द करू शकेल.

17. एक्सचेंजवर कार्यवाही केलेले व्यवहार जिथे व्यवहाराची कार्यवाही केली जाते त्या एक्सचेंजेसच्या नियमांच्या, उपकलमांच्या आणि नियमनांच्या आणि त्याखाली निर्गमित केलेल्या परिपत्रकांच्या/नोटीसेसच्या अधीन असतील आणि एक्सचेंजेसचे नियम, उपकलमे आणि नियमने आणि त्याखाली निर्गमित केलेल्या परिपत्रकांना/नोटीसेसना प्रभावी करण्याच्या हेतूसाठी जिथे व्यवहाराची कार्यवाही केली जाते त्या एक्सचेंजेस्च्या उपकलमांत आणि नियमनांत विनिर्दिष्टीत केलेल्या न्यायालयाचा न्यायाधिकार अशा व्यवहारातील सर्व पक्षांनी मान्य केलेला असावा.

**वटाव/दलाली**

18. अशील स्टॉक ब्रोकरला वेळोवेळी अस्तित्वात असलेली आणि अशीलाच्या खात्याला, व्यवहारांना आणि स्टॉक ब्रोकरने अशीलाला दिलेल्या सेवेला लागू असतील त्याप्रमाणे दलाली आणि वैधानिक कर प्रदान करेल. स्टॉक ब्रोकर संबंधित स्टॉक एक्सचेंजेसचे नियम, नियमने आणि उपकलमे आणि SEBIचे नियम, नियमने यानुसार अनुज्ञेय असलेल्या कमाल दलालीपेक्षा जास्त दलाली आकारणार नाही.

**परिसमापन आणि स्थितीचे क्लोज आउट**

19. स्टॉक ब्रोकरच्या इतर हक्कांना (प्रकरण लवादाकडे संदर्भित करण्याच्या हक्कासह) बाधा न येता, अशीलाला समजते कि स्टॉक ब्रोकर मार्जीन्स किंवा इतर रकमांचे, थकित ऋणांचे वगैरे प्रदान न करण्याबद्दल अशीलाच्या सर्व किंवा कोणत्याही स्थिती परिसमापित करण्यास / क्लोज आउट करण्यास आणि अशा परिसमापनाचे / क्लोज आउटचे उत्पन्न अशीलाच्या, काही असल्यास, दायित्वांसमक्ष / कर्तव्यांसमक्ष समायोजित करण्यास पात्र आहे. अशा परिसमापनाच्या / क्लोज आउटच्या खाती होणारे एखादे आणि सर्व नुकसान आणि आर्थिक आकार अशीलाला लावले जातील आणि तो ते वहन करेल.

20. अशीलाच्या मृत्यूच्या किंवा नादारीच्या प्रसंगात किंवा अशीलाने ज्या सिक्युरिटीजच्या खरेदीसाठी किंवा विक्रीसाठी आदेश दिले असतील त्या प्राप्त करण्यासाठी किंवा त्यांच्यासाठी प्रदान करण्यास किंवा त्यांची डिलीव्हरी करण्यास तो अन्यथा असमर्थ ठरल्यास, स्टॉक ब्रोकर अशीलाचे व्यवहार क्लोज आउट करू शकेल आणि नुकसानाचा, काही असल्यास, अशीलाच्या मालमत्तेसमक्ष दावा करू शकेल. त्यातून उत्पन्न होणाऱ्या अधिशेषासाठी अशील किंवा त्याचे नामनिर्देशिती, उत्तराधिकारी, वारस, आणि अभिहस्तांकिती पात्र असतील. अशीलाने नोंद घ्यावी कि नामनिर्देशितीच्या नावे निधी/सिक्युरिटीजचे हस्तांतरण स्टॉक ब्रोकरद्वारे कायदेशीर वारसांच्या समक्ष वैध कार्यमुक्ती असेल.

21. स्टॉक ब्रोकर एखाद्या अशीलाद्वारे प्रदानातील/डिलीव्हरीतील कसूर आणि संबंधित पैलूंच्या बाबतीतील माहिती संबंधित स्टॉक एक्सचेंजच्या नजरेला आणेल. कसूरदार अशील कॉर्पोरेट एकक / भागीदारी / मालकीच्या फर्म्स किंवा इतर कोणतेही कायदेशीर एकक असेल तर, जसे प्रकरण असेल तसे, संचालक(कां)ची / प्रवर्तक(कां)ची / भागीदार(रां)ची / मालकाचे नाव(वे) स्टॉक ब्रोकरद्वारा संबंधित स्टॉक एक्सचेंजला कळविली जातील.

**विवादांची सोडवणूक**

22. स्टॉक ब्रोकर अशीलाला संबंधित स्टॉक एक्सचेंजेस आणि SEBIचे संबंधित संपर्क तपशील पुरवेल.

23. स्टॉक ब्रोकर त्यांच्या मार्फत मार्गस्थ केलेल्या व्यवहारांच्या बाबतीत तक्रारींचे निराकरण करण्यात आणि शेअर्सच्या अनिष्ट प्रकारे डिलीव्हरीसाठी हरकती दूर करण्यात, अनिष्ट प्रकारे डिलीव्हरीतील चुका दुरुस्त करण्यात वगैरे सहकार्य करेल.

24. अशील आणि स्टॉक ब्रोकर ठेवी, मार्जीन मनी वगैरेंच्या बाबतीतील कोणतेही दावे आणि/किंवा विवाद जिथे व्यवहाराची कार्यवाही झाली त्या एक्सचेंजच्या नियमांप्रमाणे, उपकलमांप्रमाणे आणि नियमनांप्रमाणे आणि त्याखाली निर्गमित केलेल्या वेळोवेळी अंमलात असलेल्या परिपत्रकानुसार/नोटीसेस प्रमाणे लवादाकडे संदर्भित करतील.

25. स्टॉक ब्रोकर त्याच्या आणि अशीलाच्या समोरासमोर झालेल्या व्यवहारांतून उद्भवणाऱ्या कोणत्याही लवादाच्या कारवाईच्या जलद पूर्ततेची खात्री करेल आणि अशा कारवाईत लवादाच्या निर्णयांची अंमलबजावणी करण्यासाठी तो जबाबदार असेल.

26. अशील/स्टॉक ब्रोकर समजतात कि अशील/स्टॉक ब्रोकरच्या विवादाच्या सोडवणूकीसाठी एखाद्या अधिकृत प्रतिनिधीने निर्गमित केलेल्या सूचना, काही असतील तर, सदरहू अशील/स्टॉक ब्रोकरच्या वतीने व्यवहार करण्यासाठी सदरहू प्रतिनिधीला अधिकार देणाऱ्या पत्रानुसार त्या अशील/स्टॉक ब्रोकरवर बंधनकारक असतील.

**संबंधांची समाप्ती**

27. कोणत्याही कारणाने स्टॉक ब्रोकरचे स्टॉक एक्सचेंजवर सभासदत्व रद्द झाल्यास स्टॉक ब्रोकर आणि अशीलाच्या दरम्यानचे संबंध समाप्त केले जातील. ह्या कारणांत स्टॉक ब्रोकरची कसूर, मृत्यू, राजीनामा किंवा हकालपट्टी किंवा बोर्डाने प्रमाणपत्र रद्द करणे देखील सामील आहेत.

28. स्टॉक ब्रोकर, सब-ब्रोकर आणि अशील अन्य पक्षांना किमान एक महिना आगाऊ लेखी नोटीस देऊन, अन्य पक्षाला कोणतेही कारण न देता त्यांच्या दरम्यानचे संबंध समाप्त करण्यास पात्र असतील. अशा कोणत्याही समाप्तीचा विचार न करता, या संबंधांच्या समाप्तीच्या पूर्वी करण्यात आलेल्या व्यवहारांतून उद्भवलेले किंवा त्या बाबतीतील सर्व हक्क, दायित्वे आणि कर्तव्ये अस्तित्वात राहतील आणि संबंधित पक्ष किंवा त्यांच्या वारसांवर, कार्यवाहकांवर, प्रशासकांवर, कायदेशीर प्रतिनिधींवर आणि उत्तराधिकाऱ्यांवर, जसे प्रकरण असेल तसे, निहीत असतील/बंधनकारक असतील.

29. सब-ब्रोकरच्या मृत्यूच्या/नादारीच्या किंवा बोर्डाकडील त्याची नोंद रद्द होण्याच्या किंवा स्टॉक एक्सचेंजद्वारे सब-ब्रोकरची मान्यता मागे घेतली जाण्याच्या आणि कोणत्याही असेल त्या कारणासाठी, स्टॉक ब्रोकरद्वारे सब-ब्रोकरबरोबरचा करार समाप्त केला जाण्याच्या प्रसंगात, अशीलाला अशा समाप्तीबाबत कळविण्यात येईल आणि अशील स्टॉक ब्रोकरचे थेट अशील असल्याचे मानले जाईल आणि अशीलाने स्टॉक ब्रोकरला एक महिन्यापेक्षा कमी नसलेली लेखी सूचना देऊन त्यांचे संबंध समाप्त करण्याचा हेतू कळविल्याशिवाय, स्टॉक ब्रोकर, सब-ब्रोकर आणि अशीलाला शासित करणारी 'हक्क आणि कर्तव्ये' कागदपत्रे अंमलात असतील तशीच पुढे चालू राहतील.

**अतिरिक्त हक्क आणि कर्तव्ये**

30. स्टॉक ब्रोकर त्याच्या मार्फत मार्गस्थ केल्या व्यवहारांच्या संबंधातील अशीलाचे लाभांशाचे हक्क, राइटस् किंवा बोनस शेअर्स वगैरेंच्या बाबतीत यथायोग्य संरक्षण देईल आणि तो ज्या अशीलांचे सिक्युरिटीजमध्ये व्यवहार असू शकतील असा अशीलांच्या हितसंबंधांना मारक ठरू शकेल असे काहीही करणार नाही.

31. स्टॉक ब्रोकर आणि अशील SEBIने आणि जिथे व्यवहाराची कार्यवाही करण्यात आली होती त्या संबंधित एक्सचेंजने निर्गमित केलेले नियम, नियमने, उपकलमे, परिपत्रके, नोटीसेस आणि मार्गदर्शक तत्त्वे यानुसार त्यांच्या खात्यांचा वेळोवेळी ताळमेल घालतील आणि व्यवहारपूर्ति करतील.

32. स्टॉक ब्रोकर त्याच्या घटकांना कार्यवाही केलेल्या व्यवहारांसाठी एक्सचेंजद्वारा विहीत केलेला असू शकेल अशा प्रारुपात वेळोवेळी एक काँट्रॅक्ट नोट देईल ज्यात आदेश क्रमांक, व्यवहार क्रमांक, व्यवहाराची वेळ, व्यवहाराची किंमत, व्यवहाराची राशी, डेरिव्हेटिव्ज कराराचा तपशील, अशीलाचा कोड, दलाली, लावलेले सर्व आकार वगैरे व्यवहारांच्या सर्व नोंदी असतील आणि इतर सर्व संबंधित तपशील असतील व जो एक्सचेंजने विहीत केलेल्या पद्धतीने आणि वेळेच्या आत भरणे आणि देणे आवश्यक असेल. स्टॉक ब्रोकर व्यवहाराच्या कार्यावाहीपासून एका कार्य दिवसाच्या आत हार्ड कॉपीत आणि/किंवा डिजीटल सहीचा वापर करून इलेक्ट्रॉनिक स्वरुपात गुंतवणूकदाराला काँट्रॅक्ट नोट पाठवेल.

33. स्टॉक ब्रोकर अशीलाने अन्यथा विनिर्दिष्टीत केलेले असल्याशिवाय जिथे व्यवहाराची कार्यवाही करण्यात आली त्या संबंधित एक्सचेंजकडून पेआउटच्या प्राप्तीपासून एका कार्य दिवसाच्या आत, आणि जिथे व्यवहाराची कार्यवाही करण्यात आली त्या संबंधित एक्सचेंजने विहीत केलेल्या असू शकतील अशा अटी आणि शर्तींच्या अधीन, जसे प्रकरण असेल तसे, निधी पेआउट करेल किंवा सिक्युरिटीजची डिलीव्हरी देईल.

34. स्टॉक ब्रोकर जिथे व्यवहाराची कार्यवाही केली जाते त्या संबंधित एक्सचेंजद्वारा वेळोवेळी विहीत केलेला असू शकेल अशा नियतकालाने आणि प्रारुपात अशा वेळेच्या आत, त्याच्या प्रत्येक अशीलाच्या संबंधातील निधी आणि सिक्युरिटीज उभयतांचे संपूर्ण 'खाते विवरणपत्र' पाठवेल. विवरणपत्रात असेही विधान असेल कि अशील, विवरणपत्रात काही चुका असल्या तर, स्टॉक ब्रोकरकडून ते प्राप्त झाल्यापासून, जिथे व्यवहाराची कार्यवाही करण्यात आली होती त्या संबंधित एक्सचेंजद्वारे वेळोवेळी विहीत करण्यात आली असू शकेल अशा वेळेच्या आत, चुका कळवेल.

35. स्टॉक ब्रोकर डेली मार्जीन विवरणपत्र अशीलाला पाठवेल. डेली मार्जीन विवरणपत्रात इतर बाबींबरोबरच, जमा केलले सांपार्श्विक, विनियोग केलेले सांपार्श्विक, आणि सांपार्श्विकाची स्थिती (उपलब्ध शिल्लक/अशीलाकडून येणे) रोख, मुदत ठेव पावत्या (FDRs), बँक गॅरंटी आणि सिक्युरिटीज अशा विभागणीसह तपशील समाविष्ट असावा.

36. अशील स्टॉक ब्रोकरबरोबर संबंध स्थापित करण्यासाठी आवश्यक ती कायदेशीर क्षमता आणि त्याला तसा अधिकार असल्याची आणि याच्या खालील त्याची कर्तव्ये आणि वचनपत्रे पार पाडण्यास तो सक्षम असल्याची खात्री करेल. अशील जे करू शकेल अशा सर्व व्यवहारांचे अनुपालन करण्याची खात्री करण्याकरिता आवश्यक असलेल्या सर्व कृती अशील असे व्यवहार करण्यापूर्वी पूर्ण करेल.

**इलेक्ट्रॉनिक काँट्रॅक्ट नोट (ECN)**

37. अशीलाने इलेक्ट्रॉनिक स्वरुपातील काँट्रॅक्ट नोट प्राप्त करण्याचा पर्याय स्वीकारला, तर तो स्टॉक ब्रोकरला उचित इमेल आयडी पुरवेल. इमेल आयडी मधील कोणताही बदल अशील स्टॉक ब्रोकरला प्रत्यक्ष पत्र पाठवून कळवेल. अशीलाने इंटरनेट व्यवहाराचा पर्याय स्वीकारला असेल, तर इमेल आयडीच्या बदलाची विनंती अशीलाच्या विशिष्ट आयडी आणि पासवर्डच्या सुरक्षित ॲक्सेसमार्फत करता येऊ शकेल.

38. इमेलमार्फत पाठविलेली ECN डिजीटल सही केलेली, एन्क्रिप्टेड आणि ढवळाढवळ न करता येणारी असेल आणि आयकर अधिनियम, 2000 च्या तरतूदींचे अनुपालन करणारी असेल याची स्टॉक ब्रोकर खात्री करेल. इमेल मार्फत पाठवलेली ECN जोडपत्र म्हणून पाठवली असेल, तर जोडपत्र म्हणून पाठवलेली फाइलसुद्धा डिजीटल सही, एन्क्रिप्शन आणि ढवळाढवळ न करता येणारी करून सुरक्षित केलेली असेल.

39. अशीलाने नोंद घ्यावी कि स्टॉक ब्रोकरला बाउन्स्ड मेल अधिसूचना प्राप्त न होणे म्हणजे अशीलाच्या इमेल आयडीवर काँट्रॅक्ट नोटची डिलीव्हरी झाली असा अर्थ असेल.

40. स्टॉक ब्रोकर ECNआयकर अधिनियम, 2000 चे अनुपालन करून ECN आणि इमेलची पोचपावती एक्सचेंजने विहीत केलेल्या पद्धतीने आणि SEBI/स्टॉक एक्सचेंजेसने वेळोवेळी निर्गमित केल्याप्रमाणे अस्तित्वात असलेले नियम/नियमने/परिपत्रके/ मार्गदर्शक तत्त्वे यानुसार सॉफ्ट आणि ढवळाढवळ न करता येण्याऱ्या स्वरूपात राखून ठेवेल. डिलीव्हरीचा पुरावा म्हणजेच काँट्रॅक्ट नोट पाठवताना प्रणालीने निर्माण केलेले लॉग रिपोर्ट स्टॉक ब्रोकरद्वारा SEBI/स्टॉक एक्सचेंजेसच्या अस्तित्वात असलेल्या नियमनांच्या अधीन विनिर्दिष्टीत केलेल्या

कालावधीसाठी राखून ठेवले जातील. लॉग रिपोर्ट अशीलाला न पोचलेल्या कॉंट्रॅक्ट नोटचा/फेटाळलेल्या किंवा बाउन्स्ड बॅक झालेल्या इमेल्सचा तपशील पुरवेल. बाउन्स्ड मेल्स अधिसूचना मिळाल्याची खात्री करण्यासाठी स्टॉक ब्रोकर नेहमी SEBIच्या/स्टॉक एक्सचेंजेसच्या अस्तित्वात असलेल्या नियमनांच्या अधीन ठरवून दिलल्या वेळेच्या आत सर्व आवश्यक पावले उचलेल.

41. जे अशील कॉंट्रॅक्ट नोट इलेक्ट्रॉनिक स्वरुपात प्राप्त करण्याचा पर्याय स्वीकारत नाहीत त्यांना प्रत्यक्ष पद्धतीने कांट्रॅक्ट नोट पाठविणे स्टॉक ब्रोकर सुरू ठेवेल. जेव्हा केव्हा ECNECN अशीलाला पोचलेल्या नसतील किंवा अशीलाच्या इमेल आयडी द्वारे फेटाळण्यात आलेल्या असतील, त्या त्या वेळी स्टॉक ब्रोकर SEBI/एक्सचेंजेसच्या अस्तित्वात असलेल्या नियमनांच्या अधीन ठरवून दिलेल्या वेळेच्या आत अशीलाला प्रत्यक्ष कॉंट्रॅक्ट नोट पाठवेल आणि अशा प्रत्यक्ष कॉंट्रॅक्ट नोटच्या डिलीव्हरीचा पुरावा राखून ठेवेल.

42. अशीलाला ECN कम्युनिकेशन व्यतिरिक्त, स्टॉक ब्रोकर त्याच वेळी त्याच्या नेमून दिलेल्या वेबसाइटवर, जर असेल, एका सुरक्षित मार्गाने ECN प्रसिद्ध करेल आणि अशीलाला संबंधित ॲक्सेस सक्षम करेल आणि ह्या हेत्वर्थ, तो अशीलाला कॉंट्रॅक्ट नोट इलेक्ट्रॉनिक पद्धतीने जतन करण्याच्या आणि/किंवा त्याची प्रिन्ट आउट काढून घेण्याच्या पर्यायासह एक विशिष्ट यूजर नेम आणि पासवर्ड प्रदान करेल.

**कायदे आणि न्यायक्षेत्र**

43. या दस्तऐवजात ठरवून दिलेल्या विशिष्ट हक्कांव्यतिरिक्त, स्टॉक ब्रोकर, सब-ब्रोकर आणि अशील, ज्या एक्सचेंजमध्ये व्यवहार करण्याची अशील निवड करेल त्या एक्सचेंजचे नियम, उपकलमे आणि नियमने आणि त्याखील निर्गमित करण्यात आलेली परिपत्रके/नोटीसेस किंवा SEBIचे नियम आणि नियमने यांच्या अधीन स्टॉक ब्रोकर किंवा अशीलाला असू शकतील असा इतर हक्कांचा वापर करण्यास पात्र आहेत.

44. या दस्तऐवजातील तरतूदी सदैव सरकारी अधिसूचना, SEBIने निर्गमित केलेले कोणतेही नियम, नियमने, मार्गदर्शक तत्त्वे आणि परिपत्रके/नोटीसेस आणि जिथे व्यवहारांची कार्यवाही केली जाते त्या संबंधित एक्सचेंजच्या वेळोवेळी अंमलात असू शकतील असे नियम, नियमने आणि उपकलमांच्या अधीन असतील.

45. स्टॉक ब्रोकर आणि अशील आर्बिट्रेशन ॲंड कन्सिलिएशन अधिनियम, 1996 खाली लवादाने दिलेल्या कोणत्याही निर्णयाचे पालन करतील. तथापि, कोणताही एक पक्ष लवादाच्या निर्णयाने समाधानी नसेल तर स्टॉक एक्सचेंजच्या आतच अपीलाची तरतूद आहे.

46. या दस्तऐवजात वापरलेल्या परंतु, यात व्याख्या न केलेल्या शब्दांचा आणि अभिव्यक्तींचा अर्थ, संदर्भानुसार अन्य असणे आवश्यक असल्याशिवाय, तोच असेल जो एक्सचेंजेस/SEBIचे नियम, उपकलमे, नियमने आणि त्याखाली निर्गमित करण्यात आलेल्या परिपत्र/नोटीसेसमध्ये त्यांना ठरवून देण्यात आलेला आहे.

47. स्टॉक ब्रोकरने भर टाकलेली कोणतीही अतिरिक्त स्वेच्छेची कलमे/दस्तऐवज एक्सचेंजेस्/SEBIचे नियम/नियमने/ नोटीसेस/परिपत्रके यांचा भंग करणारे नसावेत. अशा स्वेच्छेच्या कलमांतील/दस्तऐवजा(जां)तील कोणताही बदल 15 दिवस आधीच्या सूचनेने करण्यात यावा. एक्सचेंजेस/SEBIने विनिर्दिष्टीत केलेल्या हक्क आणि कर्तव्यातील कोणतेही बदलसुद्धा अशीलांच्या नजरेला आणून दिले जावेत.

48. यातील पक्षांच्या हक्कांत आणि कर्तव्यांत SEBIच्या नियमांतील आणि नियमानांतील बदलांच्या परिणामी किंवा जिथे व्यवहारांची कार्यवाही केली जाते त्या संबंधित एक्सचेंजच्या उपकलमांतील, नियमांतील आणि नियमनांतील बदलांमुळे बदलले गेले तर, असे बदल या दस्तऐवजात नमूद केलेल्या पक्षांच्या हक्कांतील आणि कर्तव्यांतील बदल म्हणून यात अंगीकृत करण्यात आले आहेत असे मानण्यात यावे.

**स्टॉक ब्रोकरद्वारे अशीलाला पुरविण्यात आलेली इंटरनेट आणि वायरलेस तंत्रज्ञानावर आधारित सुविधा ('हक्क आणि कर्तव्य दस्तऐवजा(जां)त' नमूद केलेली सर्व कलमे लागू असतील. त्या व्यतिरिक्त, याठिकाणी नमूद केलेली कलमेसुद्धा लागू होतील.)**

1. मोबाइल फोन, डेटा कार्ड सहित लॅपटॉप, वगैरे अशा इंटरनेट प्रोटाकॉल (IP) चा वापर करणाऱ्या साधनांचा समावेश असेल अशा वायरलेस तंत्रज्ञानाच्या वापरामार्फत इंटरनेट आधारित व्यवहार (IBTIBT) आणि सिक्युरिटीजचा व्यवहार पुरविण्यास स्टॉक ब्रोकर पात्र आहे. स्टॉक ब्रोकरने SEBI आणि एक्सचेंजेस वेळोवेळी विनिर्दिष्टीत करू शकतील अशा वायरलेस तंत्रज्ञानाचा वापर करून इंटरनेट आधारित व्यवहारांना/सिक्युरिटीज व्यवहारांना लागू होतील अशा सर्व आवश्यकतांचे अनुपालन करावे.

2. अशील सिक्युरिटीजमध्ये गुंतवणूक करण्यास/व्यवहार करण्यास इच्छुक आहे आणि त्या हेत्वर्थ, अशील एका इंटरनेट आधारित व्यवहाराच्या सुविधेचा किंवा वायरलेस तंत्रज्ञानामार्फत सिक्युरिटीजचा व्यवहार करण्याच्या सुविधेचा वापर करण्यास इच्छुक आहे. स्टॉक ब्रोकर त्याची IBT सेवा अशीलाला पुरवेल, आणि अशील SEBI/एक्सचेंजेसच्या तरतूदी आणि स्टॉक ब्रोकरच्या IBTवर

विनिर्दिष्टित केलेल्या अटी आणि शर्तींवर आणि त्यांच्या अधीन, जर त्या एक्सचेंजेस/SEBIने विहीत केलेल्या नियमांना अनुसरून असतील तर, स्टॉक ब्रोकरच्या IBT सेवेचा लाभ घेईल.

3. स्टॉक ब्रोकरने वायरलेस तंत्रज्ञान/इंटरनेट/स्मार्ट ऑर्डर रुटिंग किंवा इतर कोणत्याही तंत्रज्ञानामार्फत सिक्युरिटीजच्या व्यवहाराशी संबंधित वैशिष्ट्ये, जोखमी, जबाबदाऱ्या, कर्तव्ये आणि दायित्वे यांची अशीलाला जाणीव करून द्यावी.

4. स्टॉक ब्रोकरने अशीलाला जाणीव करून द्यावी कि स्टॉक ब्रोकरची IBT प्रणाली सुरवातीला स्वतःच पासवर्ड निर्माण करते आणि एक्सचेंजेस/SEBIने विहीत केलेल्या नियमांना अनुसरून ठरवून दिल्याप्रमाणे त्याचे पासवर्ड धोरण आहे.

5. यूजर नेम आणि पासवर्ड गोपनीय आणि सुरक्षित ठेवण्यासाठी अशील जबाबदार असेल आणि कोणत्याही व्यक्तीने अशीलाचे यूजर नेम आणि पासवर्ड वापरून दिलेल्या सर्व आदेशांसाठी आणि व्यवहारांसाठी अशील एकट्यानेच जबाबदार असेल, त्या व्यक्तीला तसे करण्याचा अधिकार असो वा नसो. तसेच अशीलाला जाणीव आहे कि ऑर्डर रुटेड प्रणालीमार्फत वायरलेस तंत्रज्ञानाच्या मार्गाने इंटरनेट व्यवहार/सिक्युरिटीजमधील व्यवहारांसाठी अधिकृतता तंत्रज्ञाने आणि सुरक्षा उपाय आवश्यक आहेत आणि कर्मचारी आणि स्टॉक ब्रोकरचे डीलर्स यांच्यासहित कोणत्याही तिसऱ्या पक्षाला अशीलाचा आणि/किंवा त्याच्या अधिकृत प्रतिनिधीचा पासवर्ड उघड न करण्याची खात्री करण्याचे वचन देतो.

6. अशील पासवर्ड विसरला, स्टॉक ब्रोकरच्या IBT प्रणालीत दोष आढळले, विसंगति आढळली/संशय आला, त्याच्या यूजर नेमचा आणि पासवर्डचा वापर करून अनधिकृत वापर करणाऱ्याचा संपूर्ण तपशील, तारीख, पद्धत आणि अशा अनधिकृत वापराच्या अनुषंगाने केलेले व्यवहार वगैरे स्टॉक ब्रोकरला ताबडतोब लेखी अधिसूचित करेल.

7. वायरलेस तंत्रज्ञानाच्या मार्गाने इंटरनेटवरून/सिक्युरिटीज व्यवहाराचे आदेश मार्गस्थ करण्यासाठी सेवेचा लाभ घेण्याशी संबंधित असलेल्या जोखमींची अशीलाला जाणीव आहे आणि त्या त्याला समजल्या आहेत आणि अशीलाच्या यूजरनेम/पासवर्डने कोणत्याही पद्धतीने केलेल्या कोणत्याही आणि सर्व कृतींसाठी अशील पूर्णपणे जबाबदार आणि उत्तरदायी आहे.

8. स्टॉक ब्रोकर आदेश/व्यवहाराची पुष्टी अशीलाला त्याच्या विनंतीवरून इमेलमार्फत पाठवेल. अशीलाला जाणीव आहे कि आदेश/व्यवहाराची पुष्टी वेब पोर्टलवरून पुरविण्यात आलेली आहे. अशील वायरलेस तंत्रज्ञानाचा वापर करून व्यवहार करत असेल तर, स्टॉक ब्रोकर आदेश/व्यवहाराची पुष्टी अशीलाच्या उपकरणावर पाठवेल.

9. अशीलाला जाणीव आहे कि इंटरनेट वरून व्यवहार करण्यात अनेक अनिश्चीत घटक आणि क्लिष्ट हार्डवेअर, सॉफ्टवेअर, प्रणाली, संवादाच्या वाहिन्या, पेरिफेरल्स, वगैरे सामील असतात, ज्यात व्यत्यय येणे आणि ते स्थानभ्रष्ट होणे शक्य आहे. स्टॉक ब्रोकर आणि एस्क्चेंज, स्टॉक ब्रोकरची IBT सेवा कोणत्याही व्यत्ययाविना अशीलाला सर्व काळ उपलब्ध असेल असे कोणतेही निवेदन करत नाहीत किंवा हमी देत नाहीत.

10. स्टॉक ब्रोकरच्या IBT प्रणालीचे कोणतेही प्रलंबन, व्यत्यय, अनुपलब्धता किंवा चुकीचे कार्य, किंवा एक्सचेंजची सेवा किंवा प्रणाली किंवा अशीलाच्या/स्टॉक ब्रोकरच्या/एक्सचेंजच्या बाजूने, स्टॉक ब्रोकर/एक्सचेंजेसच्या नियंत्रणाबाहेरील कोणत्याही कारणासाठी कोणताही दुवा/प्रणाली बंद पडण्यामुळे त्याच्या आदेशाची कार्यवाही न होणे यासाठी अशीलाचा एक्सचेंज किंवा स्टॉक ब्रोकरच्या विरोधात कोणताही दावा असणार नाही.

## जोडपत्र - 6

### मार्गदर्शन टिपण - गुंतवणूकदारांसाठी एक्सचेंज(जेस)वर ट्रेडिंग करताना काय करावे आणि काय करू नये ह्याकरिता सूचना

**ट्रेडिंग सुरू करण्यापूर्वी**

1. तुम्ही फक्त SEBI नोंदणीकृत मध्यस्थांशी आणि मध्यस्थांमार्फत व्यवहार करण्याची खात्री करा. स्टॉक एक्सचेंजेस www.exchange.com आणि SEBI वेबसाईट www.sebi.gov.in वर उपलब्ध यादीतून तुम्ही SEBI नोंदणी प्रमाणपत्र क्रमांक तपासून घेऊ शकता.
2. KYC प्रपत्र पूर्ण भरण्याची आणि KYC प्रपत्रातील कोरी फील्ड्स (रकाने) खोडण्याची खात्री करा.
3. तुम्ही सर्व अनिवार्य प्रपत्रे वाचल्याची खात्री करा, उदाहरणार्थ, हक्क आणि जबाबदाऱ्या, जोखीम प्रकटन प्रपत्र, स्टोक ब्रोकरचे धोरण आणि कार्यपद्धती प्रपत्र.
4. तुमच्यामध्ये आणि स्टॉक ब्रोकरमध्ये मान्य झालेली काही ऐच्छिक कलमे असल्यास ती वाचून समजून घेण्याची खात्री करा आणि मगच त्यावर सही करा. ध्यानात घ्या की तुमच्यामध्ये आणि स्टॉक ब्रोकरमध्ये मान्य झालेली कलमे तुमच्या संमतीशिवाय बदलता येणार नाहीत.
5. ट्रेडिंगसाठी तुम्हाला ब्रोकरने आकारलेले सर्व ब्रोकरेज (दलाली), कमिशन्स, शुल्के आणि इतर आकारण्यांबाबत आणि SEBIने/ स्टॉक एक्सचेंजेसने निर्दिष्ट केलेल्या संबंधित तरतुदींबाबत/मार्गदर्शक सूचनांबाबत स्पष्ट कल्पना असू द्या.
6. तुम्ही निष्पादित केलेल्या दस्तऐवजांची प्रत स्टॉक ब्रोकरकडून विनामूल्य मिळवा.
7. जर तुम्हाला तुमचा बँक आणि डिमॅट अकाऊंट संचालित करण्यासाठी स्टॉक ब्रोकरच्या नावे मुखत्यारपत्र (POA) निष्पादित करायचे असेल तर कृपया ह्या संदर्भात SEBIने/एक्सचेंजेसने निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना पहा.

**व्यवहार आणि व्यवहारपूर्ति**

8. तुम्ही लिखित स्वरूपात प्राधिकृत केल्यास स्टॉक ब्रोकर इलेक्ट्रॉनिक कॉंट्रॅक्ट नोट्स (ECN) निर्गमित करू शकेल. त्यासाठी तुम्ही तुमचा ईमेल आयडी स्टॉक ब्रोकरला द्यायला हवा. जर तुम्हाला संगणकाची माहिती नसेल तर तुम्ही ECN पर्याय स्वीकारू नये.
9. तुमच्या इंटरनेट ट्रेडिंग अकाऊंटचा पासवर्ड कोणाशीही शेअर करू नका.
10. कुठल्याही स्टॉक ब्रोकरला रोख रक्कम देऊ नका.
11. स्टॉक ब्रोकरच्या नावाने अकाउंट पेयी धनादेश काढा. सब-ब्रोकरच्या नावाने चेक देऊ नका. तुम्ही स्टॉक ब्रोकरला दिलेल्या रकमेचा/रोख्यांच्या जमेचा तुमच्याकडे कागदोपत्री पुरावा असल्याची खात्री करून घ्या, ज्यामध्ये दिनांक, स्क्रिप, संख्या, कुठल्या बँक/डिमॅट खात्याच्या नावे रक्कम किंवा रोख्यांची जमा केलेली आहे आणि कुठल्या बँक/डिमॅट खात्यामधून, हा तपशील असेल.
12. व्यवहार पडताळणीची सोय स्टॉक एक्सचेंजेसच्या वेबसाईट्सवर उपलब्ध आहे, जिथे करारपत्रात दिल्यानुसार व्यवहारातील तपशीलांची पडताळणी होऊ शकेल. जर वेबसाईटवर दिलेले व्यवहाराचे तपशील करारपत्रातील तपशीलांशी जुळत नसतील, तर ताबडतोब संबंधित स्टॉक एक्सचेंजच्या गुंतवणूकदार गाऱ्हाणी केंद्राशी संबंध साधा.
13. तुम्ही चल खाते (रनिंग अकाऊंट) राखण्याचा विशेष प्राधिकार दिला असल्यास, एक्सचेंजमधून पेआउट मिळाल्यानंतर एका कार्य दिवसात तुमच्यापर्यंत निधी किंवा रोखे (जे काही असेल ते) कदाचित पोचणार नाहीत. म्हणून, पुढील अटींची पूर्तता होत असल्यास, स्टॉक ब्रोकर तुमच्यासाठी रनिंग अकाऊंट राखेल :
    - अ) तुम्ही दिलेल्या अशा प्राधिकारावर फक्त तुम्हीच सही करून तो दिनांकित कराल आणि तुम्ही तो कधीही मागे घेऊ शकता असे कलम त्यामध्ये असेल.
    - ब) निधी आणि रोखे यांची प्रत्यक्ष व्यवहारपूर्ति स्टॉक ब्रोकर तुमच्या पसंतीनुसार किमान तिमाहीतून किंवा महिन्यातून एकदा करेल. खात्याचे व्यवहार पूर्ण करताना, स्टॉक ब्रोकर तुम्हाला खात्यांचे विवरण पाठवील ज्यात पैशासंबंधी ग्राहकाच्या खातेवहीतील उतारा आणि पैसे/रोखे प्राप्त/पोहोचते केल्याच्या नोंदी असतील. ह्या विवरणात निधी किंवा रोखे ठेवून घेतले असल्यास आणि तारण ठेवलेल्या शेअर्सचा तपशीलही असेल.
    - क) व्यवहारपूर्तीच्या दिवशी, थकित दायित्वापोटी आवश्यक रोखे/निधी ठेवून घेईल आणि संभवतः पुढील 5 दिवसांमध्ये डेरिवेटिव मार्जिन दायित्व पूर्ण करण्यासाठी अपेक्षित निधीही ठेवून घेईल, ज्याचा हिशेब एक्सचेंजेसने निर्दिष्ट केलेल्या रीतीने केलेला असेल. रोखीच्या व्यवहारांबाबत स्टॉक ब्रोकर व्यवहारपूर्ति दिनांकास ग्राहकांकडून येणे असलेल्या संपूर्ण पे-इन दायित्वासाठी निधी आणि रोखे राखून ठेवण्याची शक्यता आहे आणि पुढच्या दिवसासाठी आवश्यक असलेल्या व्यापारासाठी तो निधी/ रोखे/ मार्जिन राखून ठेवील अशी शक्यता असते, ज्याचे मूल्य रोख बाजारात अशा व्यवहारपूर्ती दिवशी केलेल्या देवघेवींच्या मूल्याइतके असेल.

ड) खातेवहीतील उतारा किंवा व्यवहारपूर्तीमध्ये काही वाद असल्यास तो तुम्ही लिखित स्वरूपात, असे निधी/रोखे किंवा विवरण जे काही असेल ते मिळाल्याच्या दिनांकापासून शक्यतो कामकाजाच्या 7 (सात) दिवसांच्या आत स्टॉक ब्रोकरच्या नजरेस आणून देणे गरजेचे असते. वाद झाल्यास हे प्रकरण संबंधित स्टॉक एक्सचेंजेसच्या गुंतवणूकदार तक्रार कक्षाला लेखी सादर करावे.

14. जर तुम्ही चल खाते राखण्याचा पर्याय स्वीकारलेला नसेल, आणि एक्सचेंजेसमधून पेआऊट मिळण्याच्या दुसऱ्या दिवशी तुम्हाला निधीचा/रोख्यांचा पे-आऊट मिळाला नाही तर ही बाब स्टॉक ब्रोकरच्या निदर्शनास आणा. जर काही वाद असेल तर संबंधित स्टॉक एक्सचेंजच्या गुंतवणूकदार तक्रार कक्षाकडे ताबडतोब लेखी तक्रार देण्याची खात्री करा.

15. ट्रेडिंगच्या प्रत्येक दिवसाच्या अखेरीस स्टॉक एक्सचेंजेसकडून एसएमएस किंवा ईमेलद्वारा ट्रेडिंगचे अलर्टस्/व्यवहारांचे तपशील मिळविण्यासाठी तुमच्या स्टॉक ब्रोकरकडे कृपया तुमचा मोबाईल क्रमांक आणि ईमेल आयडी नोंदवा.

**ट्रेडिंग सदस्यत्व खंडित झाल्यास**

16. जर एखाद्या स्टॉक ब्रोकरने त्याचे सदस्यत्व प्रत्यार्पित केले, त्याला सदस्यत्वातून निर्यापित करण्यात आले किंवा तो कसूरदार म्हणून घोषित झाल्यास स्टॉक एक्सचेंज एक जाहीर सूचना देते आणि त्याद्वारे फक्त त्या स्टॉक एक्सचेंजच्या "ट्रेडिंग प्रणालीवर निष्पादित व्यवहारांशी" संबंधित दावे गुंतवणूकदारांकडून मागविते. संबंधित स्टॉक एक्सचेंजकडे निर्दिष्ट कालावधीत समर्थनार्थ कागदपत्रांसह दावा सादर करण्याची खात्री करा.

17. तुम्ही स्टॉक ब्रोकरकडे जमा केलेल्या पैशाला/ रोख्यांना किती संरक्षण आहे हे जाणून घ्या, विशेषत: जर तुमच्या स्टॉक ब्रोकरने कसूर केली किंवा त्याच्या दिवाळखोरीची किंवा नादारीची वेळ आली तर तुम्हाला किती प्रमाणात असे पैसे/ रोखे वसूल करता येतील हे जेथे ट्रेडिंग झाले आहे त्या संबंधित स्टॉक एक्सचेंजेसच्या उपविधींवर आणि नियमावलींवर तसेच वेळोवेळी अंमलात असलेल्या गुंतवणूकदार संरक्षण निधी योजनेवर अवलंबून असू शकते.

**वाद/ तक्रारी**

18. कृपया ध्यानात घ्या की लवाद कामकाज, ब्रोकर्सच्या विरुद्ध दंडात्मक कारवाई आणि स्टॉक ब्रोकर्सविरुद्ध गुंतवणूकदारांच्या तक्रारी संबंधित स्टॉक एक्सचेंजेसच्या वेबसाईट्सवर प्रदर्शित केलेल्या असतात.

19. संबंधित स्टॉक ब्रोकर / सब-ब्रोकर तुमच्या प्रश्नाची/ समस्येची/ तक्रारीची सोडवणूक करीत नसेल तर तुम्ही ते प्रकरण संबंधित स्टॉक एक्सचेंजकडे नेऊ शकता. जर तुमच्या तक्रारीच्या निवारणाबाबत तुम्ही समाधानी नसाल तर तुम्ही ते प्रकरण वरपर्यंत म्हणजे SEBIकडे नेऊ शकता.

20. कृपया ह्याची नोंद घ्या की सर्व स्टॉक ब्रोकर्ससाठी/ सब-ब्रोकर्ससाठी SEBIने तक्रारनिवारण विभागाचा/ अनुपालन अधिकाऱ्याचा ई-मेल आयडी तक्रारी नोंदविण्याच्या खास हेतूसाठी निश्चित करणे अनिवार्य केले आहे.